इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्यासंदर्भात काही प्रश्न आणि/अथवा तक्रार असल्यास, सदस्यांनी https://www.evoting.nsdl.com (NSDL वेबसाइट) च्या डाउनलोड विभागात उपलब्ध मदत आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान वापरकर्ता मॅन्युअलचा संदर्भ घ्यावा किंवा NSDL, 301, 3रा मजला, नमन चेंबर्स, G ब्लॉक, प्लॉट नं. C-32, बीकेसी, मुंबई - 400 051 येथे संपर्क साधावा किंवा 1800-21-09911 /022-4886 7000 या टोल फ्री क्रमांकावर कॉल करावा किंवा evoting@nsdl.co.in आणि helpdesk-evoting@cdslindia.com क्रमांकावर विनंती पाठवावी .

डिपॉझिटरी अर्थात NSDLआणि CDSL द्वारे लॉग-इनशी संबंधित कोणत्याही तांत्रिक समस्यांसाठी वैयक्तिक सदस्यांसाठी मदत कक्ष :

लॉग-इन प्रकार	मदत कक्ष तपशील
NSDL कडे असणाऱ्या सिक्युरिटीज	लॉग-इन मध्ये कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास NSDL मदत कक्षाला evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून संपर्क साधावा किंवा टोल फ्री नंबर: 022-4886 7000 वर संपर्क करावा
CDSL कडे असणाऱ्या सिक्युरिटीज	लॉग-इन मध्ये कोणत्हीही तांत्रिक समसया असणारे सदस्य helpdesk.evoting@cdslindia.com विनंती पाठवून CDSL मदत कक्षाशी किंवा 1800-21-09911 वर संपर्क साधू शकतात

मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशाने
सही/-
दुर्गेश कदम
प्रमुख - विधी आणि कंपनी सचिव
सदस्यत्व क्रमांक F8496

ठिकाण: मुंबई
तारीख: 18 नोव्हेंबर 2026

गोरेगाव, दिंडोशी येथील मुंबई नगर दिवाणी न्यायालयात
वाणिज्यिक वाद क्र. १५५ सन २०२५

वाद सादर केला रोजी : ०२.०४.२०२५
वाद नोंदवला रोजी : ११.०६.२०२६

वाणिज्यिक न्यायालये, वाणिज्यिक विभाग आणि उच्च न्यायालय अधिनियम, २०१५ चा वाणिज्यिक अपीलेट विभाग, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ६ अंतर्गत वाणिज्यिक विवादाशी संबंधित
वादातील समस्यांच्या तडजोडीसाठी समन्स.

बँक ऑफ इंडिया, बँकिंग कंपनीज् (ॲक्विझिशन ॲण्ड टान्सफर ऑफ अंडरटेकिंग्ज) ॲक्ट-१९७० अंतर्गत स्थापित, घटीत, एक निगम मंडळ, त्यांचे मुख्यालय येथे स्टार हाऊस, सी-५, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ आणि त्यांच्या शाखा कार्यालयांपैकी एक आहे अजय अपार्टमेंट, ७, आय. बी. पटेल रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३ येथे स्थित गोरेगाव (पूर्व) शाखा, द्वारा तिचे प्राधिकृत प्रतिनिधी, श्री. श्रीभगवान गुप्ता, वय ५८, वादींचे मुख्य व्यवस्थापक. **....वादी**

विरुद्ध

श्री. विशाल राधू गोयल,
मे. अपेक्षा एंटरप्रायझेसचे प्रोप्रायटर, प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र. १५०१, १५ वा मजला, सी विंग, अविराही सीएचएसएल, प्रेम नगर, मीरा रोड (पूर्व), ठाणे - ४०१ १०७. **....प्रतिवादी**

सूचना घ्यावी की, सदर सन्माननीय न्यायालय खालील अनुतोषांकरिता वरील नावाच्या वादींद्वारे **०४.०२.२०२७ रोजी स. ११.०० वा.** न्यायालय खोली क्र. ०५ मधील पीठासिन **सन्माननीय न्यायाधीश श्री. जी. बी. जाधव** यांच्या समोर प्रचालित होणार आहे.

ए. की, प्रतिवादींना वादासाठी **निशाणी ''एच''** अशा वादींच्या दाव्याच्या तपशिलानुसार वाद दाखल केल्या तारखेपासून प्रदानाच्या आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत मासिक आधारे कॅश क्रेडिट, जीईसीएल खात्याच्या अंतर्गत खेळते भांडवल मुदत कर्ज -I आणि जीईसीएल अंतर्गत खेळते भांडवल मुदत कर्ज -II च्या संदर्भातील द.सा. ११.८५%, द.सा. ९.२५% आणि द.सा. ९.२५% दराने त्यावरील पुढील व्याजासह एकत्रित क्र. ००९८३०११०००१२३ धारक कॅश क्रेडिट खात्याच्या अंतर्गत थकीत **रु. १०,९४,१११.३१ (रुपये दहा लाख चौऱ्याण्णव हजार एकशे अकरा आणि पैसे एकतीस फक्त),** क्र. ००९८७०४१००००११० धारक जीईसीएल खात्याच्या अंतर्गत खेळते भांडवल मुदत कर्ज -I खात्याच्या अंतर्गत थकीत **रु. ६३,१९०.६८ (रुपये त्रेसष्ट हजार एकशे नव्वद आणि पैसे अडुसष्ट फक्त)** आणि क्र. ००९८७०४१००००१६४ धारक जीईसीएल खात्याच्या अंतर्गत खेळते भांडवल मुदत कर्ज -II अंतर्गत थकीत **रु. १,०२,०११.२९ (रुपये एक लाख दोन हजार अकरा आणि पैसे एकोणतीस फक्त),** एकूण **रु. १२,५९,३१३.२८ (रुपये बारा लाख एकोणसाठ हजार तीनशे तेरा आणि पैसे अठ्ठावीस फक्त)** ची रक्कम वादींना अदा करण्याचे आदेश आणि हुकूम द्यावेत.

बी. की, घोषित करावे की, वरील सदर पतुसुविधांच्या संदर्भातील वादींच्या थकबाकीचा परतावा होजियारी कपडे, टी-शर्ट इ. अशा जंगम मिळकतींच्या वैध आणि अस्तित्वातील तारणाने रितसर सुरक्षित आहे.

सी. की, प्रतिवादींच्या मालकीच्या होजियारी कपडे, टी-शर्ट इ. सदर सन्माननीय न्यायालयाच्या आदेश आणि निर्देशांनुसार व त्यांच्याकडून विकण्यात यावे आणि त्याची निव्वळ विक्री रक्कम वादींना किंवा वरील विनंती (ए) मध्ये दावा केलेल्या थकबाकीच्या समाधानासाठी हवाली करण्यात यावी.

डी. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने विक्रीच्या अधिकारासह दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश XL नियम १ अन्वये सर्व अधिकारांसह होजियारी कपडे, टी-शर्ट इ. चे प्रापक म्हणुन न्यायालयीन प्रापक किंवा अन्य कोणत्याही योग्य व सक्षम व्यक्तीची नियुक्ती करावी आणि त्याची निव्वळ विक्री रक्कम वादींना किंवा येथील दावा केलेल्या त्यांच्या थकबाकीच्या समाधानासाठी हवाली करावी.

ई. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने, प्रतिवादींना स्वत: किंवा त्यांचे नोकर, एजंटस् किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस होजियारी कपडे, टी-शर्ट इ. अशा जंगमगहाण जंगम मिळकतींच्या संदर्भात हस्तांतर किंवा निकाली काढण्यास किंवा त्रयस्थ पक्षकारांचे अधिकार बनवण्यास प्रतिबंध करावा.

एफ. की, वादींना वरील प्रार्थना (ए) आणि (ई) च्या बाबतीत अंतरिम आणि अधि-अंतरिम अनुतोष मंजूर करावेत.

जी. खटल्याचे स्वरुप आणि परिस्थितीनुरुप आवश्यक अशा अन्य आणि पुढील अनुतोषांसाठी.

एच. वादाच्या खर्चांसाठी

सदर दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२६

अति. प्रबंधक,
नगर दिवाणी न्यायालय, मुंबई

शिक्का

सीलर
अनंत बी. शिंदे ॲण्ड कं.
वादींसाठी वकील
३११, वर्मा चेंबर, ३ रा मजला,
११, होमजी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
प्रति,
श्री. विशाल राधू गोयल,
मे. अपेक्षा एंटरप्रायझेसचे प्रोप्रायटर

Chola Enter a better life

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय येथे: चोला क्रेस्ट, सी५४ आणि ५५, सुपर बी-४, थिरु वि का इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०० ०३२.

स्थावर मिळकतींच्या विक्री करीता ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) (नियम ८ आणि ९) सहवाचता सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीसाठीची ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाणदार(रां)ना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या तारण धनकोकडे गहाण ठेवलेल्या स्थावर मिळकतींचा **सांकेतिक कब्जा** चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला असून, यापुढे त्यांचा उल्लेख चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड असा करण्यात येईल. सदर तारण मत्तांची विक्री ई-लिलावाद्वारे **''जेथे आहे त्या स्थितीत'', ''जसे आहे तसे'' आणि ''जे काही आहे ते''** या तत्त्वांवर करण्यात येईल. याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, आम्ही **https://bankauctions.in/** या **संकेतस्थळाद्वारे** जाहीर ई-लिलाव आयोजित करणार आहोत.

कर्ज खाते क्र. टीएल०१टीएनए०००००५०२१६, कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदारांची नावे: १. मे. अग्रिवा कमर्शियल ट्रेड प्रायव्हेट लिमिटेड, (कर्जदार) ६१६, सीएफडी, सेंट्रल फॅसिलिटी बिल्डिंग, सेक्टर - ९, एपीएमसी फ्रूट मार्केट तुर्भे, नवी मुंबई, एपीएमसी मार्केट, ठाणे, महाराष्ट्र - ४००७०५, **२. श्री. संजीव महतो, (सह-कर्जदार)** फ्लॅट क्र. सी/१४, १ ला मजला, चंद्रकुंज सीएचएस लि., कोर्ट लेन, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०० ०८३, **३. सौ. रिंकी महतो, (सह-कर्जदार)** फ्लॅट क्र. सी/१४, १ला मजला, चंद्रकुंज सीएचएस लि., कोर्ट लेन, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०००८३. **थकबाकी रक्कम: रु. ७६,३०,५४९/- ०५.११.२०२६ रोजीस**

स्थावर मिळकतीचे वर्णन

कार्यालय क्र. ६१६, मोजमापीत ५६५ चौ. फूट (बिल्टअप क्षेत्र), ''सेंट्रल फॅसिलिटी बिल्डिंग'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या ६व्या मजल्यावर, फ्रूट मार्केट, प्लॉट क्र. ३ आणि ७, गट क्र. ७९६, सेक्टर क्र. १९ असलेल्या जमिनीवर बांधलेले, तुर्भे/वाशी, नवी मुंबई, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे स्थित चे सर्व ते भाग आणि विभाग.

राखीव किंमत : रु. ७०,००,०००/-, ईएमडी : रु. ७,००,०००/-, बोली वाढीची रक्कम : रु. १,००,०००/-

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : २७.१२.२०२६ - स. ११ ते दु. १२ वा.
(प्रत्येकी ३ मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह) इअर सादर करण्याची अंतिम तारीख : २६.१२.२०२६,
मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख: आगाऊ ठरवल्याप्रमाणे

१. सर्व इच्छुक सहभागी/बोलीदार यांना **https://bankauctions.in** आणि **www.foreclosureindia.com** ला भेट देण्याची विनंती करण्यात येते. ई-लिलाव तपशिल, मदत, प्रक्रिया आणि ऑनलाईन ट्रेनिंग करिता, इच्छुक बोलीदारांनी कृपया **मे. ४ क्लोजर, (संपर्क व्यक्ती: श्री. नितेश पवार, दूर. क्र. ८१४२०००७२५, ई-मेल : nithesh@bankauctions.in)**
२. पुढील तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता, ई लिलावात सहभागी होण्याकरिता कृपया **https://bankauctions.in** आणि **https://cholamandalam.com/news/auction-notices** ला भेट द्या किंवा संपर्क **श्री. अभिजित देशपांडे-फोन क्र. ९८६७०००५५३.**

सदर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) सहवाचता नियम ८ आणि ९ अन्वये सांविधानिक ३० दिवसीय विक्री सूचना सुद्धा आहे.

तारीख : १८.११.२०२६ — **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : नवी मुंबई — **चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड**

FEDERAL BANK YOUR PERFECT BANKING PARTNER

एलसीआरडी मुंबई विभाग
दी फेडरल बँक लि., एलसीआरडी/मुंबई विभाग, १३४, १३वा मजला, जॉली मेकर चेंबर क्र. २, नरीमन पॉईंट, मुंबई, महाराष्ट्र-४०००२१,
ई-मेल : mumlcrd@federalbank.co.in
दूरध्वनी: ९१-८८२८२२६७२९
वेबसाईट: www.federal.bank.in,
सीआयएन: एल६५१९१केएल१९३१पीएलसी०००३६८|

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ॲक्ट असे उल्लेखित) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या ८(६) च्या तरतुदींन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत ही दी फेडरल बँक लि. (तारण धनको) कडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष कब्जा दी फेडरल बँक लिमिटेड (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती १) श्री. दलसिंगर गुप्ता आणि २) श्री. प्रदीप दलसिंगर गुप्ता यांचेकडून विक्रीच्या तारखेरोजीस दी फेडरल बँक लि. (तारण धनको) ला थकीत २६/०८/२०२४ रोजीस रु. ३६,४४,३५९.८० (रुपये छत्तीस लाख चव्वेचाळीस हजार तीनशे एकोणसाठ आणि ऐंशी पैसे मात्र) (०४/०९/२०२४ रोजीस सन्माननीय कर्ज वसुली न्यायाधिकरण-३, मुंबई, डायरी क्र. १५३४ सन २०२४ नुसार दावा केलेली रक्कम) सह २६/०८/२०२४ पासून त्यावरील पुढील व्याज, प्रभार आणि परिव्ययाच्या वसुलीकरिता **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने **०८.१२.२०२६** रोजी विकण्यात येणार आहे. राखीव किंमत **रु. २५,३८,०००/- (रुपये पंचवीस लाख अडतीस हजार मात्र)** राहील आणि इसारा अनामत रक्कम **रु. २,५३,८००/- (रुपये दोन लाख त्रेपन्न हजार आठशे मात्र)** राहील.

तारण मिळकतीचे वर्णन

सर्वे क्र. १५९, हिस्सा क्र. ५ए, लोधा हेवन, गाव निलजे, डोंबिवली पूर्व, तालुका कल्याण, ठाणे-४२१२०४, महाराष्ट्र धारक जमिनीवर स्थित शकुंतला संकल्प अशा ज्ञात इमारतीच्या ३ऱ्या मजल्यावरील मोजमापीत ९४० चौ. फु. बिल्टअप क्षेत्र (८७.३६ चौ.मी.) निवासी फ्लॅट क्र: ई ३०७ चे ते सर्व भाग व विभाग **आणि सिमाबद्धः पूर्वेला द्वारे** रस्ता, **दक्षिणेला द्वारे** रो हाऊस, **पश्चिमेला द्वारे** नदी **आणि उत्तरेला द्वारे** बंगलो.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया दी फेडरल बँक लि. ची वेबसाईट म्हणजेच https://www.federalbank.co.in/web/guest/tender-notices मध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

दी फेडरल बँक लिमिटेड करिता
पांडुरंग चंद्रकांत भट्टगावकर
सहाय्यक उपाध्यक्ष आणि शाखा प्रमुख
दिनांक : १७.११.२०२६ — **(सरफैसी ॲक्ट अंतर्गत प्राधिकृत अधिकारी)**

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी)

ज्या अर्थी,

निम्नस्वाक्षरीकार **सम्मान कॅपिटल लिमिटेड चे (CIN:L65922DL2005PLC136029)** (यापूर्वी **इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** म्हणून ओळखले जात होते) सिक्योरिटाइजेशन ॲण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्योरीटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये प्राधिकृत अधिकारी आणि सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून स्पष्ट 60 दिवसांच्या आत **14.08.2026** रोजी सूचनेत नमूद केलेली आणि अधिक रक्कम **रू. 24,30,849.08 (रूपये चोवीस लाख तीस हजार आठशे एकोणपन्नास आणि आठ पैसे फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **1** वर) आणि **रू. 2,24,459.92 (रुपये दोन लाख चोवीस हजार चारशे एकोणसाठ आणि ब्याण्णव पैसे फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **2** वर) एकूण थकबाकी असलेली रक्कम **रू. 26,55,309 (रुपये सव्वीस लाख पंचावन्न हजार तीनशे नऊ फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **1** आणि **2** वर) साठी **कर्ज खाते क्र. HHLNAS00422604** आणि **HHENAS00425986** या रकमेची परत फेड करण्याची दिनांक **13.08.2026** पासून ते प्रत्यक्ष भरणा करेपर्यंतची मागणी,सूचना कर्जदार **विश्वजीत सुधाकर काटे, विराज विश्वजीत काटे उर्फ वुरज विश्वजीत काटे, विक्रांत विश्वजीत काटे, अंकिता संजय चव्हाण उर्फ अंकिता विक्रांत काटे आणि गायत्री विश्वजीत काटे उर्फ गायत्री विश्वजीत काटे** यांना कलम 13(12) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, 2002 चा नियम 3 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात जारी केली.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार अपयशी ठरल्यामुळे याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, सदर कायद्याचे कलम 13 ची उप कलम (4) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, **2002** चा नियम **8** अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात खाली वर्णन केलेल्या मालमतेचा निम्न स्वाक्षरीकाराने **प्रतिकात्मक ताबा 16.11.2026** रोजी घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे खबरदार करण्यात येते की, या मालमत्तेचे व्यवहार करू नयेत आणि कोणत्याही व्यवहारावर **सम्मान कॅपिटल लिमिटेड (यापूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जात होते)** ची कर्ज आकारणी **रू. 24,30,849.08 (रूपये चोवीस लाख तीस हजार आठशे एकोणपन्नास आणि आठ पैसे फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **1** वर) आणि **रू. 2,24,459.92 (रुपये दोन लाख चोवीस हजार चारशे एकोणसाठ आणि ब्याण्णव पैसे फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **2** वर) एकूण थकबाकी असलेली रक्कम **रू. 26,55,309 (रुपये सव्वीस लाख पंचावन्न हजार तीनशे नऊ फक्त)** (कर्ज सुविधा क्र. **1** आणि **2** वर) पुढील व्याज **13.08.2026** पासून प्रत्यक्ष भरणा करेपर्यंत लागेल.

कर्जदारांचे लक्ष्य कलम 13 चे उप-कलम (8) च्या मालमत्ता / मालमत्तेला मुक्त करण यासाठी उपलब्ध वेळेकडे आकर्षित केले जात आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका (फ्लॅट), 'डी' विंगमध्ये, बेअरींग फ्लॅट क्र. डी- 5, ज्याचे चटई क्षेत्रफळ 91.94 स्क्वे.मीटर्स आणि 'रेरा' नुसार फ्लॅटच्या संलग्न बाल्कनीचे क्षेत्रफळ 6.26 स्क्वे.मीटर्स आणि 'मोफा' कायदा, 1963 नुसार चटई क्षेत्रफळ 95.60 स्क्वे.मीटर्स. (1029 स्क्वे.फीट), ज्यामध्ये 3 खोल्या आणि किचन यांचा समावेश. तसेच, इमारतीमधील सामायिक जागा, जसे की जिने, जिन्यावरील लँडिंग आणि पंप हाऊस लिफ्ट वापरण्याचा अधिकारासहित, नाशिक गावात असलली आणि वसलेली, नाशिक महानगरपालिका हद्दीत आणि नाशिक नोंदणी व उपनोंदणी जिल्ह्याच्या हद्दीत, बेअरींग सर्व्हे क्र. 143/1ए143/1, तसेच सर्व्हे क्र.143/1A/2/2 आणि 143/1A/2/4, नाशिक - 422002, येथे वसलेले, महाराष्ट्र.

या फ्लॅटच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:
पूर्वेकडे : लिफ्ट, जिने आणि पोडियम
पूर्वेकडे : मोकळी जागा
पूर्वेकडे : पॅसेज आणि फ्लॅट क्र. डी-6
पूर्वेकडे : 'सी' विंगमधील फ्लॅट क्र. सी-8(ए).आणि सी-8(बी)

सही/-
अधिकृत अधिकारी
तारीख : 16.11.2026 — **सम्मान कॅपिटल लिमिटेड**
स्थळ : नाशिक — **(यापूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जात होते)**

---

punjab national bank ...the name you can BANK upon !

एआरएमबी मुंबई शहर
यू.बी.आय. टॉवर, ६वा मजला, २५, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
ई-मेल: cs6041@pnb.bank.in

शुद्धिपत्र

सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, १३.११.२०२६ रोजी प्रकाशित झालेल्या ई-लिलाव सूचनेतील खालील दुरुस्तीची नोंद घेण्याची सल्ला देण्यात येत आहे. दिनांक ०३.१२.२०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या लिलावासाठी अनु. क्र. १ येथे नमूद केलेल्या श्री. परमोद कुमार मोहन राज (कर्जदार) आणि श्री. अमित कुमार मोहन राज (सह-कर्जदार) यांच्या नावावरील मिळकतींच्या संदर्भात ''सरफैसी ॲक्ट २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत कब्जाची तारीख'' ही ''२५.०९.२०१९'' अशी वाचण्यात यावी.
लिलावाच्या इतर सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील.
अधिक तपशीलांसाठी कृपया क्यूआर कोड स्कॅन करावा.

तारीख: १८.११.२०२६ — **सही/-**
ठिकाण: मुंबई. — **प्राधिकृत अधिकारी**
पंजाब नॅशनल बँक

जाहीर सूचना

तमाम जनतेला **सूचना** याद्वारे देण्यात येते की, आमचे अशील **एसएपीएल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड,** (पॅन क्र. एएसीसीएस९२०४एफ) (सीआयएन : यू१७११०एमएच२००१पीटीसी १३१५४५), कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे क्र. ६८७, शाह व्हिलाजवळ, गट क्र. ४४८, आवास झिराड, आवास रोड, अलिबाग, रायगड, महाराष्ट्र ४०२२०१ येथे आणि हा सुध्दा जिचा पत्ता ३०२, ३रा मजला, मॅरेथॉन आयकॉन, लोअर परळ डिव्हिजन लगत, डिलाईल रोड, मुंबई-४०००१३, **(''मालक'')** यांच्याकडून येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषत: वर्णिलेला कार्यालयीन परिसर (''सदर परिसर'') खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत.

कोणीही आणि सर्व व्यक्ती किंवा दावेदार ज्यांच्या सदर परिसर किंवा तिच्या कोणत्याही भागावर किंवा मध्ये वारसाहक्क, शेअर, विक्री, गहाण, हस्तांतर, विकास हक्क, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, परवाना, पोट-परवाना, कुळवहिवाट, पोट-कुळवहिवाट, धारणाधिकार, परवाना, प्रभार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, बक्षीस, डिव्हाईस, अंत्यदान, अदलाबदल, कब्जा, जप्ती, गहाण किंवा बोजा किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने कोणताही शेअर, हक्क, नामाधिकार, इस्टेट किंवा हितसंबंध असल्यास किंवा कोणत्याही प्रकारचा कोणताही समझोता किंवा कराराद्वारे कोणत्याही प्रकारचा कोणताही इतर हक्क असल्यास सदर प्रसिध्दी तारखेपासून १४ दिवसात **रिझॉल लॉ पार्टनर्स, वकील आणि सॉलिसिटर्स,** ज्यांचे कार्यालय आहे १२-ए, १ला मजला, सत्यम बिल्डिंग, ३१८ लिंकिंग रोड, खार पश्चिम, मुंबई-४०००५२ येथे किंवा ईमेल : **ahtesham@resolvelaw.in** वर सर्व संबंधित कागदपत्राच्या प्रतींसह लेखी स्वरुपात कळविणे याद्वारे आवश्यक आहे, कसूर केल्यास अशा व्यक्ती/व्तींचा दावा त्यागित आणि/किंवा परित्यागित केल्याचे मानण्यात येईल आणि आमच्या अशिल त्यानुसार सदर परिसराच्या विक्रीकरिता वाटाघाटी सुरु ठेवतील. विक्री पूर्ण करतील.

खालील बाबी सदर सूचनेतून वगळण्यात आल्या आहेत आणि त्या आमच्या अशिलांना ज्ञात आहेत: (ए) स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या लाभासाठी एसबीआयकॅप ट्रस्टी कंपनी लिमिटेड च्या नावे सदर परिसरावर अस्तित्वात असलेले गहाण; आणि (बी) अनुज्ञप्तीधारक म्हणून फेअरब्रिज कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड च्या नावे सदर परिसराच्या संदर्भातील दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करार.

परिशिष्ट
(''परिसर'')

सर्व ते (१) सदर सोसायटीद्वारे(खाली दिल्याप्रमाणे) जारी शेअर प्रमाणपत्र क्र. २१ अंतर्गत जारी विभिन्न क्र. २०१ ते २१० (दोन्ही समाविष्ट) धारक १० संपूर्ण भरणा केलेले शेअर्स, (२) अप्पा साहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५, येथे स्थित, टीपीएस IV माहीमचा अंतिम प्लॉट क्र. १०९० आणि १०९२ धारक जमिनीवर बांधलेल्या ''सिनर्जी आयटी पार्क'' अशा ज्ञात इमारतीच्या सहाव्या (६ व्या) मजल्यावरील मोजमापित ४३६७.२० चौरस फूट (मोफा), युनिट क्र. सी (मंजूर ओसी प्लाननुसार) धारक आयटी/आयटीईएस युनिट **(''सदर युनिट'')**; सह (३) ६ (सहा) कार पार्किंगच्या स्पेसेस (त्यापैकी १ (एक) कार पार्किंगची जागा सदर इमारतीच्या तळघरातील (क्र. १०७) धारक आणि ५ (पाच) कार पार्किंगच्या स्पेसेस सदर इमारतीला लागून असलेल्या व तिच्याशी जोडलेल्या मल्टी लेव्हल कार पार्किंगच्या (दुसरा स्तर) स्पेसमधील (क्र. १, २, ३, ४ आणि ५) ज्या सर्व जागा आच्छादित आहेत, परंतु स्टॅक नसलेल्या आणि नॉन मॅकॅनिकल आहेत).

सदर दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६.

एहतेशाम एम. खत्री
व्यवस्थापकीय भागीदार
RESOLVE LAW PARTNERS ADVOCATES & SOLICITORS
रिझॉल लॉ पार्टनर्स
वकील आणि सॉलिसिटर

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये
एमटीएनएल भवन, ३रा मजला, स्ट्रॅंड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई ४००००५.

नि. १०

मूळ अर्ज क्र. ४३३ सन २०२६
समन्स

बँक ऑफ इंडिया ....अर्जदार
विरुद्ध
व्हिज्युअल जंकीज प्रा. लि ....प्रतिवादी

ज्याअर्थी, वरील नमूद **हस्तांतरण अर्ज क्र. ४३३ सन २०२६ २०२३** नामदार पीठासिन अधिकाऱ्यांसमोर ०३.०६.२०२६ रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन रु. **६२,७०,२५८.८२/- पैसे**च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९ (४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/सूचना जारी केली.

ज्याअर्थी समन्सच्या सेवेवर सामान्य पद्धतीने परिणाम होऊ शकत नाही आणि या माननीय न्यायाधिकरणाने बदली सेवेसाठी अर्ज करण्यास परवानगी दिली आहे.

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या **३० (तीस)** दिवसांत कारणे दाखविण्यासाठी.
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **१६/०३/२७ रोजी स. ११.०० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे आणि **डीआरटी-II** समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते, सहीने आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **०६ नोव्हेंबर २०२६** रोजी दिले.

मे. व्हिज्युअल जंकीज प्रा. लि.
१०३, ठक्कर हाईट्स, सुभाष नगर रोड,
नाहूर, भांडुप, (पश्चिम), मुंबई-४०००७८.

शिक्का

सही/-
रजिस्ट्रार
मुंबई डीआरटी-क्र. २

Bharat Bijlee

भारत बिजली लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ६ वा मजला, इलेक्ट्रिक मॅन्शन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
सीआयएन: एल३१३००एमएच१९४६पीएलसी००५०१७ **फोन:** ०२२ - ४६१४ १४१४ **फॅक्स:** ०२२ - २४३७ ०६२४
वेबसाईट: https://www.bharatbijlee.com/ **ई-मेल:** bblcorporate@bharatbijlee.com

भागधारकांसाठी सूचना
प्रत्यक्ष स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमॅटेरियलायझेशन करण्यासाठी विशेष विंडो

भारत बिजली लिमिटेड (''कंपनी'') च्या समभागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येते की, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') ने ३० जानेवारी, २०२६ दिनांकित ''गुंतवणूक सुलभ करणे - प्रत्यक्ष स्वरूपातील सिक्युरिटीजच्या हस्तांतरण आणि डिमॅटेरियलायझेशनसाठी विशेष विंडो'' या शीर्षकाच्या परिपत्रक क्र. एचओ / ३८ / १३ / ११ (२) २०२६-एमआयआरएसडी-पीओडी / आय / ३७५० / २०२६ द्वारे, ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री / खरेदी करण्यात आलेल्या आणि कागदपत्रांमधील / प्रक्रियेतील त्रुटींमुळे किंवा अन्य कारणांमुळे नाकारण्यात आलेल्या / परत पाठविण्यात आलेल्या / कार्यवाही न झालेल्या प्रत्यक्ष स्वरूपातील सिक्युरिटीजचे हस्तांतरण आणि डिमॅटेरियलायझेशन सुलभ करण्यासाठी, ०५ फेब्रुवारी, २०२६ ते ०४ फेब्रुवारी, २०२७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी एक (१) वर्षाचा विशेष विंडो सुरू केला आहे.

याव्यतिरिक्त, अशा प्रकारे हस्तांतरित केलेल्या सिक्युरिटीज सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केवळ डिमॅट स्वरूपात हस्तांतरितीच्या खात्यात अनिवार्यपणे जमा करण्यात येतील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या तारखेपासून एक (१) वर्षाच्या लॉक-इन कालावधीच्या अधीन असतील. सदर लॉक-इन कालावधीत अशा सिक्युरिटीजचे हस्तांतरण/धारणाधिकार चिन्हांकित / गहाण ठेवणे करता येणार नाही.

पात्र गुंतवणूकदारांना या संधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सर्व बाबतींत योग्यरीत्या पूर्ण करून कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (''आरटीए'') एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात) यांच्याकडे सादर करण्यास प्रोत्साहित करण्यात येत आहे.

कंपनीच्या आरटीएचा तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात आला आहे:
एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
युनिट: भारत बिजली लिमिटेड
सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३
संपर्क क्र.: +९१ २२ ४९१८ ६०००
ई-मेल आयडी: investor.helpdesk@in.mpms.mufg.com

भारत बिजली लिमिटेडकरिता
सही/-
दुर्गेश एन. नगरकर,
ठिकाण: मुंबई — **कंपनी सचिव आणि**
तारीख: १७ नोव्हेंबर, २०२६ — **वरिष्ठ महाव्यवस्थापक, कायदा**

जाहिर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, माझे अशील **मे. समायरा इस्टेट, त्यांचे भागीदार श्री. सिल्व्हन जोसेफ अल्मेडा आणि श्री. सौरभ अखिलेश गुप्ता यांच्यामार्फत, यांच्या वतीने सूचित करण्यात येते** की,

१. रामचंद्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. ही नवीन सर्व्हे क्र. २०६ मधील भूखंड क्र. २२ आणि २३ धारण करणाऱ्या, अनुक्रमे ५०४ चौ. मीटर्स आणि ५८० चौ. मीटर्स क्षेत्रफळाच्या, एकूण १,०८४ चौ. मीटर्स क्षेत्रफळाच्या, गाव दिवाणमान, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित जमिनीची मालक आहे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ए अंतर्गत सहकारी संस्थांचे उपनिबंधक, वसई यांनी पारित केलेल्या ०५.१०.२०२६ रोजीच्या आदेशान्वये, मे. समायरा इस्टेट यांची सदर सोसायटीच्या पुनर्विकासासाठी विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. त्यानुसार, २७.१०.२०२६ रोजीच्या नोंदणीकृत विकास कराराद्वारे, जो दुय्यम निबंधक, वसई-२ यांच्याकडे दस्तऐवज क्र. व्हीएसआय-२-१९७८५/२०२६ अंतर्गत ३०.१०.२०२६ रोजी नोंदणीकृत करण्यात आला आहे, सोसायटीने सदर जमीन आणि त्यावरील ''रामचंद्र'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विद्यमान इमारतीसंबंधीचे विकास हक्क मे. समायरा इस्टेट यांना, त्यांचे भागीदार श्री. सिल्व्हन जोसेफ अल्मेडा आणि श्री. सौरभ अखिलेश गुप्ता यांच्यामार्फत, प्रदान केले आहेत.

सदर मिळकतीसंबंधी कोणताही दावा, हरकत, धारणाधिकार, प्रभार, गहाण, सुखाधिकार, हक्क, मालकीहक्क किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, प्राधिकरण किंवा मंडळास याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **७ (सात) दिवसांच्या** आत सदर बाब कागदोपत्री पुराव्यासह अधोहस्ताक्षरीतांना लेखी स्वरूपात कळवावी.

विहित कालावधीत असा कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि संबंधित पक्ष त्यानंतरच्या कोणत्याही दाव्याचा संदर्भ न घेता सदर मिळकतीसंबंधी पुढील कार्यवाही करतील.

सही/-
एसपीएस अँड असोसिएट्स,
ॲडव्होकेट्स
दुकान क्र. ४४, संस्कृती अपार्टमेंट,
युको बँकेच्या मागे,
वसई-एनएलएसपी लिंक रोड,
नालासोपारा (पूर्व), तालुका - वसई, जिल्हा - पालघर-४०१२०९, **मोबा.** : ७०२१६११३६३
ई-मेल: rahuldjha94@gmail.com

जाहिर सूचना

याद्वारे **सूचना देण्यात येते** की, आमचे अशील श्री. हर्षल ओवळेकर हे श्री. पुष्पल रमेश मंत्री यांच्यासह संयुक्तपणे श्री. विघ्नेश पद्मनाभ मंजेश्वर आणि कु. व्हेनेसा मंजेश्वर (यापुढे ''विक्रेते'' म्हणून संदर्भित) यांच्याकडून खाली लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णन केलेली जागा खरेदी करण्याचा मानस बाळगतात आणि आमच्या अशिलांच्या सूचनेनुसार आम्ही सदर जागेसंबंधी विक्रेत्यांच्या मालकीहक्काची चौकशी करीत आहोत.

खाली नमूद केलेल्या जागेमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, त्यावर किंवा त्यासंबंधी विक्री, गहाण, हस्तांतरण, कब्जा, हिस्सा, भाडेपट्टा, अदलाबदल, बक्षीस, मृत्युपत्राद्वारे प्रदान, मृत्युपत्राद्वारे देणगी, न्यास, वारसाहक्क, धारणाधिकार, प्रभार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही मिळकतीवरील हक्क किंवा हितसंबंध असलेल्या किंवा असल्याचा दावा करणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी अशा हक्काची सूचना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत ६०२, फेअरी मॅनर, रुस्तम सिधवा मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे अधोहस्ताक्षरीतांना द्यावी, अन्यथा असे कोणतेही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध किंवा दावे, असल्यास, त्यांचा त्याग केलेला मानला जाईल आणि आम्ही सदर जागेसंबंधी आमची मालकीहक्काची चौकशी पूर्ण करण्यासाठी पुढील कार्यवाही करू.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन: - फ्लॅट क्र. १२०२, क्षेत्र मोजमाप १२०८ चौ. फूट चटई क्षेत्र किंवा त्याच्या आसपास, ''गोदरेज द ट्रीज'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या ''ओ'' विंग, फेज २ मध्ये, पिरोजशानगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०००७९ येथे स्थित, गाव विक्रोळी, तालुका कुर्ला येथील सीटीएस क्र. ५१/बी धारण करणाऱ्या जमिनीवर बांधलेला, त्यासह क्र. यूबी ९०७ आणि यूबी ९०८ धारण करणाऱ्या दोन (२) आच्छादित स्वतंत्र कार पार्किंग जागा, आणि त्यासह प्रत्येकी रु. ५०/- चे दहा (१०) पूर्ण भरणा केलेले समभाग, विशिष्ट क्र. २४२१ ते २४३० (दोन्ही समाविष्ट) धारण करणारे, समभाग प्रमाणपत्र क्र. २४१ मध्ये समाविष्ट, आणि सदर जागेसंबंधी रेसिडेन्सेस फेज-२ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मधील विक्रेत्यांचे सदस्यत्वाचे हक्क (सदस्य नोंदणी क्र. २४१).

दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६.

दुर्गाप्रसाद सबनीस
ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर
६०२, फेअरी मॅनर,
रुस्तम सिधवा मार्ग,
फोर्ट, मुंबई ४००००१

जाहिर सूचना

याद्वारे जनतेस सूचित करण्यात येते की, **सनटेक सिटी ॲव्हेन्यू २ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.** मधील सर्व पार्किंग जागा या सोसायटीच्या सामाईक क्षेत्रांचा भाग असून त्या सोसायटीच्या मालकीच्या आहेत. कोणताही वैयक्तिक सभासद, रहिवासी, विकासक किंवा तृतीय पक्ष यांना कोणत्याही पार्किंग जागेची विक्री, हस्तांतरण किंवा त्यावर कोणतेही हक्क निर्माण करण्याचा अधिकार नाही.

त्यामुळे जनतेस सावध करण्यात येते की, सोसायटीच्या आवारातील **कोणत्याही पार्किंग जागेच्या खरेदी/वाटप/हस्तांतरण/आरक्षण/कोणत्याही प्रकारच्या हक्काच्या निर्मितीचा कोणताही व्यवहार** स्वीकारू नये. असा कोणताही व्यवहार **सोसायटीकडून स्वीकारला जाणार नाही** आणि तो संबंधित व्यक्तीच्या स्वतःच्या जोखमीवर व जबाबदारीवर असेल.

व्यवस्थापन समितीच्या आदेशानुसार
सनटेक सिटी ॲव्हेन्यू २ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.
नोंदणी क्र.: एमयुएम/डब्ल्यूपी/एचएसजी/टीसी/१६३२४/२०२५-२६ दिनांक १०-१०-२०२५
सनटेक सिटी ॲव्हेन्यू २, राम मंदिर रोड
दिनांक: १८-११-२०२६ — **गोरेगाव पश्चिम, मुंबई ४००१०४**

---

punjab national bank Together for the better

शाखा - टिळक रोड, घाटकोपर (पूर्व) महाराष्ट्र-४०००७७
ई-मेल : bo4093@pnb.bank.in

कब्जा सूचना
[नियम ८(1)]
[स्थावर मिळकतीकरिता]

ज्याअर्थी,
पंजाब नॅशनल बँकेच्या अधोहस्ताक्षरी प्राधिकृत अधिकाऱ्याने सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे ज्याचा उल्लेख ''सदर कायदा'' असा करण्यात आला आहे) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **०१.०९.२०२६** रोजी मागणी सूचना जारी केली होती. त्याद्वारे कर्जदार **सौ. स्वाती शामनाथ पारकर** यांना सदर सूचनेत नमूद केलेली दिनांक **३१-०८-२०२६** रोजीची **रु. ७०,२१,३०८.७० (रुपये सत्तर लाख एकवीस हजार तीनशे आठ आणि सत्तर पैसे मात्र)** इतकी रक्कम, तसेच उक्त रकमेवरील करारानुसार लागू दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, सदर सूचनेच्या तारखेपासून/सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याचे आवाहन केले होते.

कर्जदार/गहाणदार/हमीदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे, म्हणून कर्जदार/गहाणदार/हमीदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदरहू अधिनियमाचे कलम १३ च्या उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये **१७ नोव्हेंबर, २०२६** रोजी याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदारास आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीबाबत केलेला कोणताही व्यवहार दिनांक **३१-०८-२०२६** रोजीची **रु. ७०,२१,३०८.७० (रुपये सत्तर लाख एकवीस हजार तीनशे आठ आणि सत्तर पैसे मात्र)** इतकी रक्कम आणि त्यावरील पूर्ण रक्कम अदा होईपर्यंतचे पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, इतर खर्च, शुल्क इत्यादींसाठी पंजाब नॅशनल बँकेच्या प्रभाराच्या अधीन राहील.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सदर ॲक्टच्या कलम १३च्या उप-कलम (८) च्या तरतुदी अन्वये कर्जदार/हमीदार/गहाणदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

१. गाव मरोळ, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई येथील भवानी नगर, सेव्हन हिलसमोर, सी.टी.एस. क्र. १०९/१२(पी), प्लॉट क्र. झेड-३ वर स्थित ''डॅफोडिल्स'' इमारतीच्या सी-विंगमधील तळमजल्यावरील फ्लॅट क्र. ००१ असलेल्या मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग.
२. गाव मरोळ, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई येथील भवानी नगर, सेव्हन हिलसमोर, सी.टी.एस. क्र. १०९/१२(पी), प्लॉट क्र. झेड-३ वर स्थित ''डॅफोडिल्स'' इमारतीच्या सी-विंगमधील तळमजल्यावरील फ्लॅट क्र. ००२ असलेल्या मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग

सही/-
दिनांक :- १७/११/२०२६ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण:- घाटकोपर — **पंजाब नॅशनल बँक**

सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

CFM ARC thoughtful regeneration
CIN: U67100GJ2015PTC083994

नोंदणीकृत कार्यालय : ''ब्लॉक क्र. ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लब जवळ, स. क्र. ८३५/१+३, एस. जी. हायवे, माकरबा, अहमदाबाद - ३८००५१, गुजरात'',
कॉर्पोरेट कार्यालय : १ला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -४००००१.
ईमेल: info@cfmarc.in, sweta.rana@cfmarc.in, Anmol.mishra@cfmarc.in संपर्क: ०२२-४००५५२८२

जोडपत्र-IV-ए
(नियम ८ (६) चे परंतुके पाहा)
स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) चे परंतुके अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार व हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली तारण धनकोकडे गहाण ठेवलेली/प्रभारित केलेली स्थावर मिळकत (तारण मत्ता), जिचा **प्रत्यक्ष कब्जा** सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. **(सीएफएमएआरसी ट्रस्ट- १ आयएचएफएलचे विश्वस्त म्हणून आपल्या क्षमतेत कार्यरत असलेले ''तारण धनको'')** च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेला आहे, तिची विक्री **''जे आहे जेथे आहे त्या आधारावर'', ''जे आहे जसे आहे त्या आधारावर'', ''जे काही आहे त्या आधारावर'' आणि ''विनाअवलंब''** ०८.१२.२०२६ रोजी **सायं. ०५.०० वा. ते सायं. ०६.०० वा.** या वेळेत कर्ज खाते क्र. **एचएलएपीव्हीएसएच००२६७९८५** च्या संदर्भात **२०.१०.२०२६** पर्यंत थकीत मुद्दल, थकबाकी (जमा झालेल्या विलंब प्रभारांसह) आणि व्याज यापोटी देय असलेल्या **रु. ३,४४,११,१९७/- (रुपये तीन कोटी चव्वेचाळीस लाख अकरा हजार एकशे सत्त्याण्णव मात्र)** च्या वसुलीसाठी, तसेच कर्ज करार आणि इतर संबंधित कर्ज दस्तऐवजांच्या अटींनुसार **२१.१०.२०२६** पासून लागू होणारे पुढील व्याज, कायदेशीर खर्च आणि इतर प्रभार यांसह, **यूजीसी इंजिनिअरिंग इंडिया प्रा. लि., किरण नामदेव अर्जुने उर्फ किरण नामदेव अर्जुने, शरद नामदेव अर्जुने उर्फ शरद नामदेव अर्जुने आणि वैशाली शरद अर्जुने** यांच्याकडून तारण धनकोस देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी करण्यात येईल.
मिळकतींची राखीव किंमत आणि इसारा अमानत रक्कम खाली दिलेली आहे :-

तारण मिळकतीचे वर्णन	युनिट क्र. ८०१, ८ वा मजला, चटई क्षेत्र १६३१ चौ. फूट समतुल्य १५१.५८ चौ. मीटर, लोढा सुप्रिमस-II इमारत, वागळे इस्टेट- ठाणे, इंदिरा नगरजवळ, गाव पाचपाखाडीच्या प्लॉट क्र. एफ/४ आणि एफ ४/१ वर, तालुका आणि जिल्हा ठाणे ४००६०४, महाराष्ट्र, ४-चाकी वाहनांसाठी दोन बंदिस्त पार्किंग जागांसह.
तारण कर्ज	रु. ३,४४,११,१९७/- (रुपये तीन कोटी चव्वेचाळीस लाख अकरा हजार एकशे सत्त्याण्णव मात्र) कर्ज खाते क्र. एचएलएपीव्हीएसएच००२६७९८५ च्या संदर्भात २०.१०.२०२६ तारखेरोजीस प्रलंबित असलेली रक्कम आणि अंतिम देयकापर्यंत त्यावरील पुढील व्याज, इतर खर्च आणि व्यय यांसह देय आणि प्रदेय.
राखीव किंमत (आर. पी.)	**रु. २,३५,००,०००/- (रुपये दोन कोटी पस्तीस लाख मात्र)**
निरिक्षण	विनंतीनुसार ठिकाणावर भेट
ई-लिलाव करीता वेळ: तारीख:	वेबसाइट **(www.auctionfocus.in)** द्वारे ई-लिलाव/बोली दिनांक: ०८.१२.२०२६ वेळ: सायं. ०५.०० वा. ते सायं. ०६.०० वा.
बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	०८.१२.२०२६ रोजी किंवा पूर्वी दु. ०३.०० वा.
इएमडी	**रु. २३,५०,०००/- (रुपये तेवीस लाख पन्नास हजार मात्र)**
संपर्क:	०१२४-६९१०९१०, +९१ ७०६५४५१०२४

भार जर काही असल्यास: तारण धनकोस ज्ञात नाही.
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया संबंधित मिळकतींच्या ई-लिलाव/विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती आणि इतर तपशीलांसाठी ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आपल्या बोली सादर करण्यापूर्वी तारण धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच https://www.cfmarc.in वर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा. बोलीदार www.auctionfocus.in या वेबसाइटला देखील भेट देऊ शकतात किंवा संपर्क क्र.: ०१२४-६९१०९१०, +९१ ७०६५४५१०२४; ई-मेल आयडी: auctionhelpline@sammaancapital.com वर संपर्क साधू शकतात.

सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक: १६-११-२०२६ — **सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
ठिकाण: ठाणे — **सीएफएमएआरसी ट्रस्ट -१ आयएचएफएल करिता ट्रस्टी म्हणून कार्यरत)**